# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक ०६/१२/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | विषय क्र. १) मागील मा. स्थायी समिती सभा दि. २४/११/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. २४/११/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेंत येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |
| २ | वसई-विरार शहर महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती घरोघरी पोहचावी या करीता माहिती पट (चित्रपट) तयार करणे. | **ठराव** :- महिला व बालकल्याण विभागाने गोषवाऱ्यात शिफारस केल्याप्रमाणे विधवा महिलांच्या मुलांकरीता व अंध-अपंग/ गतीमंद मुले यांच्याकरीता महिला व बालकल्याण विभागामार्फत विंद्यावर्धीनी व उत्तरदायी या योजना राबविण्यांत येत असतात. या योजनांची माहिती घरोघरी पोहचून जास्तीत जास्त लोकांना या योजनेचा फायदा व्हावा या करीता माहिती चित्रपट तयार करण्यांत यावा. याकामी श्रीम. अनामिका सिंग फिल्म डायरेक्टर यांनी १ माहिती चित्रपट बनविण्यांकरीता यापूर्वी महानगरपालिकेकडे प्रस्ताव तयार करुन सादर केलेला आहे. त्यांनी यापूर्वी विविध विभागाच्या योजनांची माहिती चित्रपट तयार केले असून त्याचा फायदा महानगरपालिकेस झालेला आहे. त्यांना या कामांचा चांगला अनुभव असून त्यांना सादर केलेल्या फिल्मच्या अनुषंगाने महिला व बालकल्याण विभागाच्या योजनांच्या माहिती चित्रपट (फिल्म) त्यांच्यामार्फत बनविण्यात यावा. या माहिती चित्रपट बनविण्याकरीता लोकेशन शोधने शुटींग करणे, साऊंड सिस्टम, एडिटिंग, ग्राफिक, कलरिंग, ट्रॅव्हलिंग इत्यादी कामी अंदाजे येणाऱ्या ४,५०,०००/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| ३ | महानगरपालिकेचे द्विनोंद लेखापद्धतीचे कामकाज करणेबाबत. | **ठराव** :- वसई-विरार शहर महानगरपालिकेचे कामकाज पुर्णत: द्विनोंद लेखापध्दतीने सुलभरित्या सुरु होईपर्यंत म्हणजे किमान सन २०१५-१६-१७-१८ या वित्तीय तीन वर्षाकरीता अंदाजे वार्षिक ८ लक्ष, ४ कर्मचारी डेटा एन्ट्रीसाठी व लेखा अंतिमीकरण करणेकामी सनदी लेखापाल यांचे मानधन अंदाजे वार्षिक ६ लक्ष एकूण वार्षिक १४ लक्ष इतक्या खर्चास तसेच याकामी सनदी लेखापाल (सी.ए.), आय.सी.डब्ल्यू.ए., एम.बी.ए., पात्र व्यवसायिक तंज्ञांच्या संस्थेकडून हे काम करुन घेणेकरीता ई-निविदा मागविणे कामी लागणाऱ्या खर्चास ही स्थायी सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफिफ शेख सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |
| ४ | वॉर्ड नं. ६० (८८) मध्ये चिंचपाडा शितल इंड. येथे मेन रोड ते ओम एन्टरप्रायझेस पर्यंत रस्ता खडीकरण व डांबरीकरण करणेकामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मंजुरी देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे.साई कन्स्ट्रक्शन यांची ४.९९% कमी दराची निविदा प्राप्त झालेली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे.साई कन्स्ट्रक्शन यांच्याशी कामाची संविदा करण्यांस मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यात येत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत** |

| | | |
|---|---|---|
| ५ | विरार पू. नारींगी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे बांधकाम करणे या कामी प्राप्त निविदांपैकी लघुत्तम दराची निविदा मंजुर करून संविदा करण्यास मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदांची तुलना करता मे.फॅब टेक इंजिनिअर्स ह्यांची निविदा (अंदाजपत्रकापेक्षा (-) २.००% कमी दराने) सर्वात कमी व वाजवी आहे. त्यानुसार येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मंजूरी मिळणेकरीता तसेच महाराष्ट्र महापालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) अन्वये ह्या कमी दराच्या निविदेस मा.आयुक्त यांनी मंजूरी दिली आहे. याकामी म.न.पा.तर्फे कायदेशीर बाबींची पुर्तता करून संविदा करणेसाठी ही सभा मान्यता देत आहे व याकामी येणाऱ्या खर्चास अंतिम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. प्रशांत राऊत सूचक :- मा.श्री. राजेंद्र पाटील** |
| ६ | वसई-विरार शहर महानगरपालिका भुयारी गटार योजनाअंतर्गत (STP-२) मुख्य मलनि:सारण वाहिनीला इमारतीच्या मलनि:सारण वाहिनीशी जोडणी करणेकामी मंजुर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मंजुरी देणेबाबत. | **ठराव** :- उपरोक्त निविदेची तुलना करता कमीत कमी दराची मे. प्राईम डेव्हलपर्स यांची ३.००% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. प्राईम डेव्हलपर्स यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. अफीफ शेख सूचक :- मा.श्री. पंकज पाटील** |
| ७ | श्री. विनोद गोरस्वा (लिपीक) हयांना वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- प्रस्तावाचा मजकुर पाहता श्री. विनोद गोरस्वा (लिपिक) ह्यांनी दिनांक २९/१२/२०१५ ते १८/०१/२०१६ व दिनांक २९/०२/२०१६ ते दिनांक २४/०३/२०१६ तसेच दिनांक १५/०४/२०१६ ते ०९/०५/२०१६ पर्यंत बॉम्बे हॉस्पीटल मुंबई येथे घेतल्याकामी झालेल्या खर्च रक्कम रु. ८,८६,८२८/- मधुन अग्रीम दिलेली रक्कम रु. १,५०,०००/- कपात करून रक्कम रु. ७,३६,८२८/- रूपयांची प्रतिपुर्ती करणेकामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले सूचक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी** |
| ८ | श्री. विवेक केशव भोईर (लिपीक) वविशम प्रभाग समिति एच हयांचे वडीलांचे वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत मान्यता मिळणेबाबत. | **ठराव** :- प्रस्तावाचा मजकुर पाहता श्री. विवेक केशव भोईर (लिपीक) ह्यांचे वडील केशव अनंत भोईर ह्यांना दिनांक ०२/०२/२०१६ ते ०८/०२/२०१६ या कालावधीत कार्डिनल ग्रेशस मेमोरियल हॉस्पीटल बंगली वसई येथे घेतल्याकामी झालेल्या खर्चापोटी रक्कम रुपये १,०५,९६८/- रुपयांची प्रतिपुर्ती करणेकामी ही सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. पंकज पाटील सूचक :- मा.श्री. चंद्रकांत गोरीवले** |
| ९ | महानगरपालिकेने ठोक वेतनावर कंत्राटीपध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्याचे वेतनामून भविष्य निर्वाह निधी कपात करुन व महानगरपालिकेचे अंशदानासह रक्कम भविष्य निर्वाह निधी खत्यात भरणा करणेबाबत. | **ठराव** :- महानगरपालिकेने ठोक वेतनावर कंत्राटीपध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्याचे वेतनातुन १२% भविष्य निर्वाह निधी कपात करुन व महानगरपालिकेचे अंशदानासह १३.३६% रक्कम भविष्य निर्वाह निधी खात्यात भरणा करणेस तसेच भविष्यात ठोक वेतनावर कंत्राटी पद्धतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांचे संख्येत वाढ झाल्यास त्या कर्मचाऱ्याचे वेतनातून देखील १२% भविष्य निर्वाहनिधी कपात करुन महानगरपालिकेच्या अंशदान १३.३६% प्रमाणे होणारी रक्कम भविष्य निर्वाहनिधी खात्यात भरण्यास ही सभा आर्थिक व प्रशासकीय मान्यता देत आहे.<br>**अनुमोदक :- मा.श्री. राजेंद्र कांबळी सूचक :- मा.श्री. अजीत नाईक** |